**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र. ६/का.५

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.

दिनांक - ४ फेब्रुवारी, २०१२.

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक- ९ मे, २००७ अन्वये निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र व आजूबाजूच्या परिसरात उमेदवारांचा प्रवेश व निवडणूक काळात उमेदवारांनी उघडावयाची प्रचार कार्यालये याबाबत आदेश दिले आहेत. तसेच याबाबत दिनांक- २९/१२/२०११ च्या आचारसंहिता आदेशातही याचा उल्लेख आहे. यासंदर्भात सदर आदेश रद्द करून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

उमेदवारांना मतदान केंद्रात प्रवेश करण्याची जी मुभा देण्यात आली आहे त्याचा गैरवापर केला जातो. यामध्ये मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात उमेदवारांने स्वतःची ओळख करून देणे किंवा मतदान केंद्रात वाजवीपेक्षा जास्त वेळ थांबणे याचा समावेश होतो. मतदारांना ओळख करून देण्याचा प्रकार निश्चितच प्रचारामध्ये मोडतो. तसेच वाजवीपेक्षा जास्त वेळ मतदान केंद्रात थांबणे हा प्रकारदेखील मतदार व निवडणूक यंत्रणा यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न असतो. असे प्रकार टाळण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला अश्या सूचना देण्यात याव्यात की मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात त्याने कोणत्याही व्यक्तीला स्वतःची ओळख करून देऊ नये किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा प्रचार करू नये. तसेच मतदान केंद्रात प्रवेश केल्यानंतर मतदान प्रक्रियेचे निरीक्षण दोन ते तीन मतदारांचे मतदान होईपर्यंत करावे. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारांस पोलिसांकरवी त्या क्षेत्राच्या बाहेर काढावे.

२.	राज्य निवडणूक आयोगाने उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. उमेदवारांनी उघडलेल्या सर्व प्रचार कार्यालयांचा खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होईल. त्यास अनुसरून किती प्रचार कार्यालये उघडावी यासंदर्भातील मर्यादा काढून टाकण्यात येत आहे. मात्र प्रचार कार्यालयांची परवानगी देताना सर्व उमेदवारांना समान तत्वानुसार परवानगी देण्यात यावी. तसेच महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणा यांनी सुरक्षितता आणि जागोजागी प्रचार कार्यालये उघडल्यास नागरिकांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेऊनच प्रचार कार्यालयांना परवानगी दयावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी